महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्रमांक २२६२०२३१/३२.

क्रमांक शारेप/२०१९-२०/चार/१४०१ दिनांक :- २५.११.२०१९

## परिपत्रक

शासकीय रेखाकला परीक्षा २०१९ चे सर्व केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक / प्राचार्य यांना कळविण्यात येते की, या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक शारेप/२०१९-२०/चार/१३०६, दिनांक १४.१०.२०१९ नुसार शासकीय रेखाकला परीक्षा दिनांक २७.११.२०१९ ते ३०.११.२०१९ या कालावधीमध्ये घेण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले असून परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक www.doa.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

शासकीय रेखाकला परीक्षा २०१९ च्या प्रश्नपत्रिका वितरण ऑनलाईन पध्दतीने करावयाची असल्याने परीक्षेच्या आयेजनाच्या दृष्टीकोनातून पुढील कार्यवाही करण्याकरिता सर्व केंद्रप्रमुख यांची तपशीलवार माहिती संचानलायाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करण्याबाबत कळविण्यात आली होती. त्यानुसार ज्या केंद्रप्रमुखांनी तपशीलवार माहिती अचूक भरली आहे. त्यांच्या बँक खात्यामध्ये प्रश्नपत्रिका डाऊनलोड केल्यानंतर छायांकित प्रतिसाठी खर्चाची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. तसेच वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका डाऊनलोड करुन प्रश्नपत्रिकांच्या छायांकित प्रति काढण्याकरिता पुरेसा वेळ देण्यात आला असून त्याप्रमाणे कार्यवाही करिता केंद्रप्रमुख यांनी दिलेल्या भ्रमणध्वनीवर प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्याबाबतचा एस.एम.एस पावठला जातो. सदर एस.एम.एस प्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करुन प्रश्नपत्रिका डाऊनलोड करुन प्राचार्यांच्या अभिरक्षेत ठेवून परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात जेणेकरुन वेळापत्रकानुसार परीक्षेचे आयोजन करता येईल.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

प्रति,
सर्व केंद्र प्रमुख तथा मुख्याध्यापक / प्राचार्य,
शासकीय रेखाकला परीक्षा २०१९.

प्रत,

१) मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
४) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
५) सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (पूर्व, पश्चिम व उत्तर)
६) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सहा.निरीक्षक, निरीक्षक चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय, औरंगाबाद / नागपुर.
८) निवड नस्ती.